स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि दयानंद कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर शहरात दहा ते चौदा नोव्हेंबर या कालावधीत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह राजस्थान , गुजरात आणि मध्यप्रदेश या राज्यातील विद्यापीठांचे संघ सहभागी होणार असून या स्पर्धेचे यु-ट्युबवर थेट प्रक्षेपण करण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी पत्रकार परिषदेत दिली. दयानंद शिक्षण संस्थेच्या क्रीडांगणावर होणाऱ्या या स्पर्धेसाठी तयार करण्यात आलेल्या मौदानाचे कै. अशोक कोंढरे क्रीडा नगरी असे नामकरण करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन दहा नोव्हेंबरला सायंकाळी पाच वाजता होणार आहे. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले हे असणार आहेत. शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित क्रीडापटू नितीन मदने यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येणार आहे.
स्पर्धेच्या समारोप सोहळ्यास अर्जुन पुरस्कार प्राप्त शांताराम जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहाणार आहे. जाधव यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे. या स्पर्धेत चार राज्यातील जवळपास ४७ विद्यापीठ संघातील सुमारे सहाशे खेळाडू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत सुमारे ५४ सामने होणार आहेत. प्रारंभीचे सामने बाद पद्धतीने होणार आहेत. खेळविण्यात येणार असून त्यानंतरचे सामने हे साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत. स्पर्धा मॅटवर होणार आहे, असे प्राचार्य डॉ. बिसेन यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नितेश स्वामी , विद्यापीठ संयोजन समिती सदस्य रवीकिरण गळगे, महेश पाळणे उपस्थित होते.

https://youtu.be/NxicALSOOU0

https://youtu.be/qtVT8nERw9Q

